# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २२.०७.२०२६ बुधवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २१.०७.२०२६ रोजी मा. जिल्हा व अती. सत्र न्यायाधीश—१८, तथा तदर्थ न्यायाधिश, विशेष कोर्ट पोक्सो, नागपुर, श्री. जे. सि. यादव साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ३१५/२०२१ मधील, पोलीस ठाणे शांतीनगर येथील अप. क्र. १०४/२०२१ कलम ३७६, ३६३, ५०६ भा.दं.वि., सहकलम ४ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी राजेश चंद्रभानजी कोटरूंगे, वय ३६ वर्षे, रा. जिजामाता नगर, खरबी, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३७६ भा.दं.वि. अन्वये १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे अतिरीक्त कारावासाची शिक्षा, तसेच, कलम ४ पोक्सो अन्वये १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे अतिरीक्त कारावासाची शिक्षा व कलम ३६३ भा.दं.वि. अन्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा, व कलम ५०६ भा.दं.वि. अन्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ३,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा, ठोठावली.**

दिनांक ११.०४.२०२१ चे १८.०० वा चे सुमारास, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत बजरंग चौक, घाट रोड, नरेश पानठेल्याजवळुन एक १७ वर्षीय अल्पवयीन फिर्यादी मुलगी आपले घरी पायदळ जात असतांना, यातील आरोपीने फिर्यादी पिडीतेस थांबवुन तीला आपले मोटारसायकल वर बसण्यास म्हटले असता, तीने मनाई केली. वरून तीला धमकी देवुन, दुचाकीवर बसविले व तिला कोराडी रोडवरील निर्जन स्थळी नेवुन, तीचे सोबत तीचे ईच्छेविरूध्द अतीप्रसंग केला. अशा फिर्यादी हिने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १२.०४.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. अमोल तांबे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. शहाजहॉ फारूख शेख यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्रीमती मिना हिवसे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोउपनि. मोहन चांदेकर, मपोहवा. स्वाती मोहड यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपिएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २१.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून २८,८२७/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायद्याअन्वये ०१ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करुन १,८५०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, कलम १३५ मपोका कायद्यान्वये २३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,६३५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६०,४७१/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) जरीपटका पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १८.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दि. १९.०७.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी कु. निकीता नरेंद्र भैसारे, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. १२६/बि, बेझनबाग ले—आऊट, जरीपटका, नागपुर यांनी त्यांची लाल काळ्या रंगाची प्लेझर मोपेड क्र. एम.एच. ३१ डि.पी. ५१२८ ही घरासमोर रोडवर नेहमीप्रमाणे पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, जरीपटका पोलीसांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन एका विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यास अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरी व्यतीरिक्त पोलीस ठाणे हद्दीतुन काळ्या रंगाची ॲक्टीवा क्र. एम.एच. ४९ वाय ७५९८, तसेच, पोलीस ठाणे सदर हद्दीतुन डिओ मोपेड क्र. एम.एच. ३१ सि.एफ. ३७७२ व होंडा शाईन क्र. एम.एच. ३१ ई.टी. ००४१ असे एकुण ०४ वाहनचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. अंगझडतीमध्ये त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु मिळाल्याने जप्त करण्यात आला. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन एकुण किंमती ५०,०५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. श्री. अनिल ताकसांडे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. आशिष मोरखडे, पोहवा. रमेश यादव, पोअं. मंगेश दोनाडकर, पंकज वरकड, राकेश सिंग व नितेश नागपुरे यांनी केली.



**३) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २१.०७.२०२६ चे १९.२० वा. ते २१.३० वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहिती वरून, राजीव गांधीनगर पुलाखाली, यशोधरानगर येथे सापळा रचुन एका काळ्या रंगाच्या स्कुटी मोपेड वाहन क्र. एम.एच. ३१ बि.एक्स. ४८५७ ला थांबवुन, त्यावरील चालक व त्याचे मागे बसलेल्या ईसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नावे १) शेख आयुब शेख मुबारक, वय ४० वर्षे, रा. हमीद नगर कब्रस्तान जवळ, यशोधरानगर २) रजब उर्फ पप्पु नियाज अली सय्यद, वय २८ वर्षे, रा. आंधळगांव, जि. भंडारा ह.मु.— बंदे नवाज नगर, गल्ली नं. ८, यशोधरानगर असे सांगीतले. अंमली पदार्थ कायद्याचे तंतोतंत

पालन करून, पंचासमक्ष त्यांची अंग व वाहनाची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात एकुण १ कि. १४९ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, व स्कुटी मोपेड असा एकुण ५३,७२५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),ii(अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. युनुसचॉद शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे, मनिष झरकर व भुषण येरोजवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे भांडेवाडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १९.०७.२०२६ चे १६.३० वा. ते दिनांक २१.०७.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत प्लॉट नं. १७५, अंबेनगर, टॉवर लाईन रोड, भांडेवाडी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अमीत सुधीर द्वारी, वय ५३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह हिंगणा येथे नातेवाईकाचे लग्नाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी कपाटाचे लॉक तोडुन त्यातील रोख २०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,९४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोहवा. घायवट ८७८८२८५१९५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** दिगांबर श्रीरामजी बोराडे, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. १२५, जुना बिडीपेठ, सक्करदरा, नागपुर हे दिनांक १२.०७.२०२६ चे ०८.३० वा. पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत निर्मल नगरी येथे कामावरून कुणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे पांढरे, अंगात— पिवळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— कपाळावर बेंड आलेले आहे.



थ्दगांबर

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**